महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

महत्वाचे /तात्काळ

जा. क्र. :तंशिविकापु/सीसीटीव्ही//२०२४-२५/ 3523
दिनांक : 27 AUG 2024

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त शासकिय/अनुदानित/विना अनुदानित पदविका,
पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

**विषय :** राज्यातील तांत्रिक,पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांत विद्यार्थीनी महिलांच्या सुरक्षिततेच्या हेतूने अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणेचे प्रभावी कार्यान्वयन करण्याबाबत..

**संदर्भ :** १.महाराष्ट्र राज्याचा रॅगिंग कायदा १९९९
२.आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या Approval Process Handbook मधील तरतूदी
३.संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/सीसीटिव्ही /२०२४/६२५, दि.२६/०८/२०२४

उपरोक्त विषयाबाबतचे संचालनालयाचे पत्र पहावे, राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी विद्यार्थीनींना मुक्त वातावरणात शिक्षण घेता यावे. त्यांची सुरक्षितता जपून त्यांना रॅगिंगसारख्या प्रकारांना तोंड द्यावे लागू नये, यासाठी शासनाने रॅगिंग प्रतिबंधक कायदा १९९९ केला. त्या अनुषंगाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रसिध्द करण्यांत येणा-या मार्गदर्शन पुस्तिकेतील ( Approval Process Handbook २०२०४-२७ ) कलम ६.५३ (g) मध्येही रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा समावेश आहे. तसेच कलम ६.५३ (g) मध्ये विद्यार्थी विद्यार्थीनींना तसेच संस्थेत कार्यरत असलेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या संरक्षणाकरीता हेल्पलाईन क्रमांक व सुरक्षा यंत्रणांची ( २४x७ ) स्थापना करण्याच्या उपाययोजनांचा समावेश आहे. संस्थांनी रॅगिंग तसेच संस्थांतील विद्यार्थीनीं व महिलांची छेडछाड होवू नये, या दृष्टीकोनातून रॅगिंग प्रतिबंधक समिती तसेच विशाखा समिती स्थापन करणे, या समित्यांची माहिती ठळकपणे सुचनाफलक आणि संकेतस्थळावर प्रसिध्द करणे विद्यार्थी विद्यार्थीनीं तसेच संस्थांतील महिला अधिकारी, कर्मचारी यांचेशी वेळोवेळी सुसंवाद साधणे, या बाबींबरोबरच संस्थेतील महत्वाच्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यांत यावेत, असेही नमूद करण्यांत आलेले आहे. परिषदेच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत वेळोवेळी संस्थांना सूचित केले आहे.

या अनुषंगाने पुनश्च निर्देशित करण्यांत येते की, शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थी विद्यार्थीनींचा तसेच महिलांचा वावर असलेली महत्वाची ठिकाणे उदा. वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कॅन्टींग, मैदान, वसतिगृह इत्यादी परिसरात त्यांना शारिरीक , मानसिक त्रास होणार नाही. अशी कृती कोणाकडूनही घडणार नाही,म्हणून प्रतिबंधक उपाययोजना करणे संस्थांना अनिवार्य आहे. त्यासाठी संस्थांनी त्यांच्या परिसरात विद्यार्थी विद्यार्थीनींना तसेच संस्थेतील महिला अधिकारी-कर्मचा-यांचा वावर असलेल्या महत्वाच्या ठिकाणी आणि संस्था परिसरात अद्ययावत सीसीटिव्ही यंत्रणा कार्यान्वीत असल्याची नियमितपणे तपासणी करावी. सदरील महत्वाची ठिकाणे आणि परिसर सीसीटिव्ही च्या परिक्षेत्रात येईल जेणेकरून विद्यार्थीनीं, महिलांना शारिरीक व मानसिक त्रास होणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. सीसीटिव्ही यंत्रणा अद्ययावत राहून आवश्यकतेनुसार त्याचे चित्रण ( फुटेज ) उपलब्ध होईल, याचीही खात्री संस्थांनी करणे गरजेचे आहे. शिक्षणाला पुरक तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनींना तसेच संस्थेतील कार्यरत असलेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर महिलांना आश्वासक वाटणा-या वातावरण निर्मितीसाठी सीसीटिव्ही यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित असेल, याची संस्थांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. रॅगिंगला पायबंद बसावा तसेच संस्थेतील विद्यार्थीनी आणि महिलांना सुरक्षित वाटावे, यासाठी संस्थेत बसविलेली सीसीटिव्ही यंत्रणा सातत्याने विनाव्यत्यय कार्यान्वित असेल. याबाबत संस्थांनी नियमितपणे आढावा घ्यावा.

वरील सुचनांच्या अनुषंगाने संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयांस त्वरीत सादर करणेसाठी या कार्यालयांस पाठवावा.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ/महत्वाचे**

परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/सीसीटीव्ही/२०२४/ ६५२ दिनांक: 26 AUG 2024

प्रति.
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर

विषय: राज्यातील तांत्रिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांत विद्यार्थीनी, महिलांच्या सुरक्षिततेच्या हेतूने अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणेचे प्रभावी कार्यान्वयन करण्याबाबत.....

संदर्भ : १) महाराष्ट्र राज्याचा रॅगिंग प्रतिबंधक कायदा १९९९
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या Approval Process Handbook मधील तरतूदी

उपरोक्त विषयाबाबत नमूद करण्यात येते की, राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी विद्यार्थीनींना मुक्त वातावरणात शिक्षण घेता यावे, त्यांची सुरक्षितता जपून त्यांना रॅगिंगसारख्या प्रकारांना तोंड दयावे लागू नये, यासाठी शासनाने रॅगिंग प्रतिबंधक कायदा १९९९ केला. त्या अनुषंगाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांचेकडून प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिकेतील (Approval Process Handbook २०२४-२७) कलम ६.४७ मध्येही रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा समावेश आहे. तसेच कलम ६.५३(g) मध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनींना तसेच संस्थेत कार्यरत असलेल्या शिक्षक-शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी यांच्या संरक्षणाकरीता हेल्पलाईन क्रमांक व सुरक्षा यंत्रणाची (२४x७) स्थापना करण्याच्या उपाययोजनांचा समावेश आहे. संस्थांनी रॅगिंग तसेच संस्थांतील विद्यार्थिनी व महिलांची छेडछाड होवू नये, या दृष्टीकोनातून रॅगिंग प्रतिबंधक समिती तसेच विशाखा समिती स्थापन करणे, या समित्यांची माहिती ठळकपणे सुचनाफलक आणि संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच संस्थेतील महिला अधिकारी, कर्मचारी यांचेशी वेळोवेळी सुसंवाद साधणे, या बाबींबरोबरच संस्थेतील महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, असेही नमूद करण्यात आलेले आहे. परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत वेळोवेळी संस्थांना सूचित केले आहे.

या अनुषंगाने पुनश्च निर्देशित करण्यात येते की, शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थी, विद्यार्थीनींचा तसेच महिलांचा वावर असलेली महत्वाची ठिकाणे उदा. वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कॅन्टीन, मैदान, वसतिगृह इत्यादी परिसरात त्यांना शारिरीक, मानसिक त्रास होणार नाही, अशी कृती कोणाकडूनही घडणार नाही, म्हणून प्रतिबंधक उपाययोजना करणे संस्थांना अनिवार्य आहे. त्यासाठी संस्थांनी त्यांच्या परिसरात विद्यार्थी, विद्यार्थीनींचा तसेच संस्थेतील महिला अधिकारी - कर्मचाऱ्यांचा वावर असलेल्या सर्व महत्वाच्या ठिकाणी आणि संस्था परिसरात अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत असल्याची नियमितपणे तपासणी करावी. सदरील महत्वाची ठिकाणे

आणि परिसर सीसीटीव्ही च्या परिक्षेत्रात येईल जेणेकरून विद्यार्थीनी, महिलांना शारिरीक व मानसिक त्रास होणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही यंत्रणा अद्ययावत राहून आवश्यकतेनुसार त्याचे चित्रण ( फुटेज ) उपलब्ध होईल, याचीही खात्री संस्थांनी करणे गरजेचे आहे. शिक्षणाला पुरक तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनींना तसेच संस्थेत कार्यरत असलेल्या शिक्षक-शिक्षकेतर महिलांना आश्वासक वाटणाऱ्या वातावरण निर्मितीसाठी सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित असेल, याची संस्थांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. रॅगिंगला पायबंद बसावा तसेच संस्थेतील विदयार्थिनी आणि महिलांना सुरक्षित वाटावे, यासाठी संस्थेत बसवलेली सीसीटीव्ही यंत्रणा सातत्याने विनाव्यत्यय कार्यान्वीत असेल, याबाबत संस्थांनी नियमितपणे आढावा घ्यावा.

उपरोक्त बाबी आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात याव्यात. वरील सूचनांच्या अनुषंगाने संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास त्वरीत सादर करावा.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : माहितीस्तव सादर

मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

प्रत : माहिती व कार्यवाहीकरीता.

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांचे प्रमुख.